ePaper

# भाजपच्या नेत्यांना सत्तेचा माज आलाय : नाना पटोले



|| वर्ष - 7 | अंक - 329 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीची हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 19 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

आतील पानांत

- मुंबईनं पंजाबच्या तोंडचा घास पळवला
- मसाबा गुप्ता होणार आई
- केजरीवाल तुरुंगात आंबे, खातात
- 'यमराज' निवडणूकीच्या रिंगणात?

## विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधा सक्षमीकरणावर भर

# मनपा शाळा करणार 'समस्यामुक्त'!

### प्रशासनाचा संकल्प : शाळा पाहणी उपक्रमात अधिकाऱ्यांना सूचना

| पिंपरी | महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील शाळांमधील पायाभूत सुविधा, समस्या व त्यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी गुरुवार, १८ एप्रिल रोजी शहरातील विविध शाळांना भेट देऊन शाळा प्रशासन व अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या. यावेळी सहाय्यक आयुक्त, विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता घोडेकर - बांगर, पर्यवेक्षक तसेच संबंधित अधिकारी वर्ग उपस्थित होता.**



शहरातील वसंतदादा पाटील विद्यामंदिर, आकुर्डी (मराठी माध्यम शाळा), फकीरभाई पानसरे उर्दू माध्यम शाळा, निगडी २/२ कन्या शाळा, रुपीनगर उर्दू माध्यम शाळा, तळवडे प्राथमिक शाळा क्र. ९८ या शाळांना अतिरिक्त आयुक्त यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेतील भौतिक सुविधा व त्यांची डागडुजी, शाळांमधील वर्गातील जुने, नादुरूस्त बेंच शक्य असल्यास आय. टी. आय मधील विद्यार्थ्यांकडून दुरुस्त करून घेणे, शालेय परिसरात स्वच्छता राखण्यासाठी सफाई कर्मचा-यांना, ठेकेदार किंवा संबंधितांना सूचना करणे, एम.आय.एस डॅशबोर्ड मध्ये सर्व विद्यार्थ्यांची माहिती वेळोवेळी अद्ययावत ठेवणे, शालेय पोषण आहारामध्ये विहित केल्यानुसार योग्य आहार मिळत असल्याबाबतची वेळोवेळी खात्री करणे, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देता येईल याबाबत प्रयत्न करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. शिक्षण विभागाचे सहायक आयुक्त विजयकुमार थोरात म्हणाले की, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विविध सोयी सुविधा देण्यासाठी शिक्षण विभाग कायम प्रयत्नशील असतो. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाळांमध्ये भौतिक सोयी सुविधा उत्तम असणे गरजेचे असून त्या देण्यासाठी विभागाने भर दिलेला आहे.

> **"महापालिकेच्या शाळांमध्ये सुधारणा करणे व शाळांच्या सध्याच्या परिस्थितीबाबत माहिती घेण्यासाठी आम्ही रोज शहरातील विविध शाळांना भेटी देत आहोत. महापालिकेच्या शाळांमध्ये दिवसेंदिवस चांगल्या सुधारणा करणे व शाळांमधील सोयी सुविधांबाबत महापालिका कायम प्रयत्नशील आहे. आगामी काळात महापालिकेच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना कोणत्याच समस्यांना सामोरे जावे लागणार नाही याची खबरदारी सुद्धा महापालिका प्रशासन घेत आहे.**
> **- प्रदीप जांभळे - पाटील, अतिरिक्त आयुक्त.**

# पुण्यात मनसे पदाधिकारी 'ऑनफिल्ड'!

### प्रचार नियोजन बैठक : महायुतीच्या उमेदवारांचा करणार प्रचार

| पुणे | महाईन्यूज

**मनसे प्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार मनसेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते महायुतीचे लोकसभेचे उमेदवार मुरलीधरअण्णा मोहोळ यांच्या प्रचारासाठी जीवाचे रान करतील व त्यांचे मताधिक्य वाढवे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील अशी ग्वाही मनसे चे नेते आणि पुणे लोकसभा प्रभारी राजेंद्र वागस्कर व मनसे शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांनी दिली.**



प्रचाराचे नियोजन करण्यासाठी भाजपा आणि मनसे च्या प्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपा चे शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश उपाध्यक्ष व लोकसभा संयोजक राजेश पांडे,लोकसभा प्रभारी श्रीनाथ भीमाले,महायुतीचे समन्वयक व प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर,पुणे शहर सरचिटणीस राजेंद्र शिळमकर, रवींद्र साळेगावकर, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुशील मेंगडे उपस्थित होते तर मनसे च्या वतीने नेते राजेंद्र वागस्कर, शहर अध्यक्ष साईनाथ बाबर प्रदेश सरचिटणीस बाळा शेडगे,प्रदेश सरचिटणीस गणेश सातपुते, प्रदेश सरचिटणीस रणजित शिरोळे , योगेश खैरे प्रवक्ते मनसे इ पदाधिकारी उपस्थित होते.

#### भाजपचे धीरज घाटे काय म्हणाले?

मनसेने महायुतीला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठिंबा दिल्याने निश्चितच आमची ताकद वाढली असून मुरलीधर मोहोळ हे मताधिक्याचा विक्रम करतील असा विश्वास वाटतो असे भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे म्हणाले. मनसे चे कार्यकर्ते दैनंदिन प्रचारात तर सहभागी होतीलच पण स्वतंत्रपणे शहर पातळीवर आणि विधानसभा निहाय मेळावे आयोजित करण्यात येतील असेही या बैठकीत ठरविण्यात आले.

# बारामतीकरांच्या मनातील सुनबाई!

## देवेंद्र फडणवीस : महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचे शक्तीप्रदर्शन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीतील राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या बारामतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी पुण्यात महायुतीतील बडे नेते सामील झाले होते. यावेळी महायुतीने शक्तिप्रदर्शन करत मोठी सभा घेतली. या सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सुनेत्रा पवार, रामदास आठवले, चंद्रकांत पाटील, प्रफुल पटेल, निलम गोऱ्हे, मुरलीधर मोहोळ उपस्थित होते.**



यावेळी भाषण करताना देवेंद्र फडणवीसांनी सुनेत्रा पवार यांचा उल्लेख बारामतीकरांच्या मनातील सूनबाई असा केला आणि अजित पवारांसह उपस्थितांनी टाळ्यांचा गडगडाट केला. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्याबाबत बोलताना बाहेरच्या पवार असं विधान केलं होतं. त्यामुळे मोठा वाद उद्भवला होता. आता सुनेत्रा पवार यांच्या प्रचारसभेत फडणवीसांनी सुनेत्रा पवार या बाहेरच्या नाही बारामतीकरांच्या मनामनातील सूनबाई आहेत असं म्हणत शरद पवारांवर अप्रत्यक्ष टोला लगावला आहे. तर फडणवीस मंचावरुन असं म्हणताच सुनेत्रा पवार यांनी हात जोडून त्यांचे आभार मानले. तसेच, अजित पवारांनी टाळ्यांचा गडगडाट केला. तसेच, उपस्थितांनीही घोषणा देण्यास सुरुवात केली. जिथपर्यंत नजर जात आहे मला लोकच लोक दिसत आहेत. बारामतीचा फैसला आजच्या सभेनेच केला आहे. जिंकण्यासाठी ७-८ लाख मतं लागतात. पण आज या मंचावर बसलेल्या नेत्यांची गोळबेरीज केली तर १२ ते १५ लाख मतं बसलेत. आता बारामतीला आणि वहिनीला कोणी थांबवू शकत नाहीत. मला विश्वास आहे सुनबाई दिल्लीला जातील म्हणजे जातील. ही लढाई पवार साहेब विरुद्ध दादा अशी नाही. सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे अशी नाही. ही ग्रामपंचायतची निवडणूक नाही. या निवडणुकीमध्ये फक्त एवढंच पाहायचं आहे की बारामतीचे खासदार नरेंद्र मोदी यांच्या बाजूने उभे राहतात की राहुल गांधी यांच्या बाजुने उभे राहतात. आता निर्णय तुमचा आहे मतं विकासाला द्यायचं की विनशाला, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.चारशे पारमध्ये बारामतीचा प्रतिनिधी पाठवला तर बारामतीच्या विकासाला चालना मिळेल. मोदींना पंतप्रधान करण्यासाठी सुनेत्रा पवारांना मतदान करा, असं आवाहन यावेळी फडणवीसांनी केलं.

### अजित पवार ॲक्शन मोडवर...

» बारामती मतदार संघातून सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज गुरुवारी दाखल केला. आता खऱ्या अर्थाने प्रचाराला सुरूवात होणार आहे. त्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार ॲक्शन मोडवर आले आहेत. त्यांनी बारामती लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या प्रचारप्रमुखांची रितसर घोषणाच करून टाकली आणि सर्वांना कामाला लागण्याचे आदेश दिले. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या समितीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे आणि किरण गुजर या तिघांचा समावेश असून ही समिती पूर्ण मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असणार आहे. विधानसभा मतदारसंघनिहाय प्रचारप्रमुखपदी बारामतीत बाळासाहेब तावरे, इंदापूरमध्ये माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, दौंडमध्ये आमदार राहुल कुल, पुरंदरमध्ये माजी मंत्री विजय शिवतारे, खडकवासल्यामध्ये आमदार भीमराव तापकीर, भोर-वेल्हा-मुळशीमध्ये कुलदीप कोंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

---

# महायुतीचा निर्धार : अबकी बार... शिवाजीराव खासदार!

## शिरूर लोकसभा रणसंग्राम: खेडमधील आवाहनानंतर वातावरण तापले

।राजगुरूनगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खेड तालुक्यातील जनतेने मला पहिल्यांदा, दुसऱ्यांदा आणि तिसऱ्यांदा खासदार केलं. याच श्रेय फक्त खेड तालुक्याला आहे, ही माझी शेवटची निवडणूक आहे, अशी भावनिक साद शिरूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी घातली आहे. विशेष म्हणजे, 'अबकी बार शिवाजीराव आढळराव पाटील खासदार' असा निर्धार महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला आहे.**



शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले की, खेड तालुक्यातील जनतेमुळे मी तीनदा खासदार झालो. मला या मतदारसंघात वीस वर्षे काम करताना तुम्ही पाहिले आहे. माझी ही शेवटची निवडणूक आहे. खेड तालुक्यासह शिरूर मतदारसंघातील कामे करण्यासाठी मला ताकद द्या.

> **मतदारांनी जीवाचे रान करून निवडून दिले; पण अमोल कोल्हे यांनी त्यांच्याशी प्रतारणा केली. आम्हाला तर साधा चहा पाजला नाही. पाच वर्षे मतदार संघ वाऱ्यावर सोडला मग खरे गद्दार तुम्हीच आहात. करोना काळात चित्रीकरणाच्या नावाखाली मतदारसंघात येण्याचे टाळले. बैलगाडा शर्यती सुरू केल्या म्हणून सांगता; पण कावळा बसायला आणि फांदी तुटायला एक वेळ झाली.**
> **- दिलीप मोहिते-पाटील, आमदार, राष्ट्रवादी.**

मनसे, शिवसेना, राष्ट्रवादी, अजित पवारांची राष्ट्रवादी आणि नंतर शरद पवार यांची राष्ट्रवादी असे पाच पक्ष फिरून झाल्यावर केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे दार ठोठावणारे तुम्ही आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या शपथविधीला हजर राहून आम्हाला मिठ्या मारणारेही तुम्हीच, अशी टीका दिलीप मोहिते पाटील यांनी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा नामोल्लेख टाळून केली. दरम्यान, २०१९च्या विधानसभा निवडणुकीत दिलीप मोहिते हे शिवाजीराव आढळरावांच्या विरोधात होते. ते विजयी झाले, त्यावेळी मोहितेंनी भाषणात ही माझी शेवटची निवडणूक असल्याचे साद मतदारांना घातली होती. हीच ट्रिक आढळरावांनी वापरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# ‘रिल्स’च्या माध्यमातून करसंकलन जागृती!

## स्पर्धेला नागरिकांचे लाखोंचे लाइक्स; तब्बल 30 लाखांच्यावर मिळाले व्ह्यूज

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने मालमत्ता करवसुलीसाठी आजपर्यंत विविध उपक्रम राबविले. नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी विभागाने होर्डिंग, पॅम्पलेट, रिक्षातून जनजागृती, सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाहन आदी आघाड्यांवर काम केले. सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणामध्ये रील्स, मीम्स, व्हिडीओ यांच्या माध्यमातून जनजागृती केली जात असून, त्याला सर्जनशीलतेची जोडसुद्धा मिळत आहे. नागरिकांमध्ये नव्या समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर पगडा निर्माण झालेला आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरातील करदात्यांना कर भरण्याचे आवाहन करण्यासाठी विभागाने सन २०२२-२३मध्ये मीम्स स्पर्धा आयोजित केली. त्यास सोशल मीडियावर उदंड प्रतिसाद मिळाल्यानंतर, विभागाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ‘रील स्टार्स’ची ‘रील स्पर्धा’ आयोजित केली. त्या स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने शहरात कर भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती तसेच नागरिकांमध्ये सकारात्मकता निर्माण झाली. मागील आर्थिक वर्षात विभागाने तब्बल ९७७ कोटींचा कर वसूल केला. नागरिकांनी वेळेत कर भरण्यासाठी विभागाने ‘एसएमएस अभियान’ राबवून नागरिकांना कायम सतर्क ठेवले. त्याचप्रमाणे रील स्पर्धेतील रील्समधून करण्यात आलेल्या आवाहनाच्या माध्यमातून नागरिकांना कॉमेडी, भावनिक संदेशामधून कर भरण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. यामुळेच नागरिकांच्या सहभागातून विभागाने कर संकलनाचा विक्रम रचला. ४२ वर्षांच्या पालिका इतिहासात पालिकेने प्रथमच ९७७ कोटींचा टप्पा पार केला.

तब्बल ३० लाख लोकांपर्यंत पोहोचले रील स्पर्धेतील व्हिडीओ... ‘मिशीवर मारताय ताव आणि थकबाकीदारांच्या यादीत तुमचं पहिलं नाव?’, ‘तुझे थकबाकीदारांच्या यादीत नाव असेल तर मी लग्न करीत नाही’, ‘नळाचे गेले पाणी; घरावर आणीबाणी? तुमचीच होती जबाबदारी’ अशा आशयामुळे नागरिकांच्या मनात कर भरण्यासाठी असलेली अनास्था झटकून मोठ्या प्रमाणामध्ये कर भरण्यासाठी नागरिक पुढे सरसावले. स्पर्धेतील रील नागरिकांच्या पसंतीस उतरून तब्बल ३० लाख इतका प्रेक्षकवर्ग मिळाला. त्याचबरोबर स्पर्धेतील रील एक लाखाहून अधिक लोकांनी लाइक करून ३० हजारांवर नागरिकांनी ते शेअर केले.




### हे आहेत स्पर्धेतील विजेते..

कर संकलन विभागाच्या रील स्पर्धेसाठी तब्बल पन्नासहून अधिक रील स्टार्स यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये व्यावसायिक, वकील, शाळकरी मुले, नोकरदार सर्व स्तरातील रील स्टार्स यांनी सहभाग नोंदविल्याने स्पर्धेतील आशय नागरिकांपर्यंत पोहोचून शहरात कर भरण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार झाले. त्यामधूनच आशय, व्हिडीओ निर्मिती, विषयाला अनुसरून मांडणी आदींचे निरीक्षण करून स्पर्धेचे विजेते जाहीर करण्यात आले आहेत.

- प्रथम क्रमांक : प्रकाश (पीयूष) मधुकर सजगणे
- द्वितीय क्रमांक : ज्योती भीमाशंकर सेतसंदी
- तृतीय क्रमांक : विष्णू धर्मा घासे
- चतुर्थ उत्तेजनार्थ क्रमांक : अस्लम रशीद शेख

> **कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी लोकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. आता लोकांना पालिकेकडे येण्याची वेळ न येता पालिका लोकांपर्यंत कशी पोचेल याचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही स्पर्धा घेण्यात आली. त्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आणि नागरिकांमध्ये कर भरण्याविषयक जागृती निर्माण झाली हे एक मोठे फलित आहे. कर संकलन विभागाच्या रील स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता ज्या ज्या विभागात समाज माध्यमांची मदत घेता येईल तिथे तिथे अशी मदत घेतली जाणार आहे. त्यातून नागरिक आणि पालिका यात संवादाचे नवनवे पुल बांधता येतील असा विश्वास आहे. नागरिकांनी रिल स्पर्धेला भरघोस प्रतिसाद दिला त्याबद्दल त्यांची पालिका अत्यंत आभारी आहे.**
>
> **– शेखर सिंह, आयुक्त,**
> **पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# मावळ : पहिल्याच दिवशी २७ उमेदवारांनी भरले अर्ज!

## लोकसभा निवडणूक रणसंग्राम : 49 नामनिर्देशन पत्र घेतल्याची नोंद

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आजपासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झाली. आज दिनांक 18 एप्रिल रोजी विहित वेळेत सुमारे 27 व्यक्तींनी आकुर्डी येथील मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून 49 नामनिर्देशन पत्र नेले आहेत. आज कोणत्याही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल केले नाही.**



नामनिर्देशन पत्र नेताना नोंदवही मध्ये संबंधितांची प्राथमिक माहिती नोंदवली जात असून यामध्ये दिनांकासह नामनिर्देशन पत्र नेणाऱ्या उमेदवाराचे नाव, पत्ता, नामनिर्देशन पत्रांची संख्या, उमेदवाराच्या वतीने त्यांचा प्रतिनिधी नामनिर्देशन पत्र घेत असल्यास त्या व्यक्तीचे नाव, राजकीय पक्षाचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, आदी बाबींची नोंद केली जात आहे. त्यानंतर नामनिर्देशन पत्र ताब्यात घेणाऱ्याची स्वाक्षरी घेऊन त्यास नामनिर्देशन पत्राची प्रत दिली जात आहे. आजसुमारे 27 व्यक्तीनी एकुण 49 नामनिर्देशन पत्रे नेली आहेत.

नामनिर्देशन पत्रे घेणाऱ्या व्यक्तींची नावे व त्यांनी नोंदविलेल्या माहितीचा तपशील :- अजय हनुमंत लोंढे (पिंपरी, अपक्ष), दादाराव किसन कांबळे (चिंचवड, अपक्ष), प्रशांत रामकृष्ण भगत (उरण, भारतीय जवान किसान पार्टी), मुकेश मनोहर अगरवाल (कामशेत, अपक्ष), रफिक रशीद कुरेशी (पिंपरी, बहुजन समाज पक्ष), डॉ.राजेश यशवंतराव नागोसे (पिंपरी, राष्ट्रवादी रिपब्लीकन पार्टी), विष्णू रामदास रानमारे (थेरगाव, अपक्ष), विनायक निवृत्ती पाटील (निगडी, अपक्ष), सुरज चंद्रकात गायकवाड (निगडी, अपक्ष), हजरत इमामसाहब पटेल (काळेवाडी, अपक्ष), विजय विकास ठाकूर (पनवेल, अपक्ष), मनोज भास्कर गरबडे (पिंपरी, अपक्ष), यशवंत विठठल पवार (कर्जत, क्रांतीकारी जयहिंद सेना), महेशसिंग नारायणसिंग ठाकूर (वाघबीळ ठाणे, धर्मराज्य पक्ष), गोंविद गंगाराम हेरोडे (निगडी, बहुजन मुक्ती पार्टी), वर्षा आर्यभाणु भुताळे (देगलुर नांदेड, दिल्ली जनता पार्टी), उमाकांत रामेश्वर मिश्रा (सोमाटणे फाटा मावळ, अपक्ष), डॉ.मिलिंदराजे दिगंबर भोसले (थेरगाव, अपक्ष), रहिम मैनुददीन सय्यद (पिंपरी, आझाद समाज पार्टी), लक्ष्मण सदाशिव अढाळगे (पनवेल, अपक्ष), मधुकर दामोदर थोरात (पनवेल, अपक्ष), सुभाष गोपाळराव बोधे (दापोडी, जनता दल धर्मनिरपेक्ष), राजेंद्र मानसिंह छाजछिडक (बोपखेल, राष्ट्रीय वाल्मीकी सेना भारतीय राष्ट्रीय जनता पार्टी राष्ट्रीय संयुक्त आघाडी), दत्तात्रय भगवंत वाघेरे (पिंपरी, अपक्ष व शिवसेना उबाठा), तुषार दिगंबर लोंढे (चिंचवड , बहुजन भारत पार्टी), राहुल निवृत्ती मदने (चिंचवड, बहुजन समाज पार्टी), सोमनाथ दत्तात्रय कुदळे (पिंपरी, अपक्ष)

### 25 एप्रिलपर्यंत अर्ज भरण्याची मुदत...

उमेदवाराला किंवा त्याच्या कोणत्याही सूचकाला निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मावळ-मुळशीचे उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी यांच्याकडे गुरुवारपर्यंत (दि.२५) सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त कोणत्याही दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात अर्ज दाखल करता येतील. सातवा मजला, बी विंग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आकुर्डी येथे मावळ लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय स्थापित केले आहे. या ठिकाणी अर्जही मिळतील. २५ एप्रिल २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची अंतिम तारीख आहे.

# आता दीर्घकालीन उपायच गरजेचा..!



## भूमिका

**आठवडाभरापूर्वी १३ व आता २९ नक्षलींना ठार करून सर्वाधिक प्रभावित क्षेत्र अशी ओळख असलेल्या बस्तरमधील सुरक्षा दलांनी चोख कामगिरी बजावली असली तरी या समस्येच्या समूळ उच्चाटनाचे काय हा गेल्या चाळीस वर्षांपासून उपस्थित होणारा प्रश्न मात्र कायम आहे.**

ऐन निवडणुकीच्या तोंडावर छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यात झालेली ही चकमक व त्यात सुरक्षा दलाला मिळालेले यश प्रशासनाचा हुरूप वाढवणारे असले तरी यावरच्या दीर्घकालीन उपायाचे काय? शस्त्रांच्या बळावर शत्रूंचा नायनाट करणे हा शौर्य दाखवण्याचा प्रकार असला तरी विकासाची जबाबदारी असलेल्या सरकारने सुरक्षा दलांच्या भरवशावर कित्येक दशके असे शौर्य दाखवत राहणे योग्य कसे ठरू शकते? नक्षलवादी चळवळीचा बीमोड कायदा व सुव्यवस्था आणि विकास या दोन पातळ्यांवरून करता येऊ शकतो हे सूत्र सरकारने स्वीकारले त्यालाही आता तीन दशके लोटली. दुर्दैव हे की यातल्या कायदा व सुव्यवस्था याच मुद्द्यावर सरकारे भर देत राहिली. त्यामुळे मोठ्या संख्येत नक्षली मारले गेले की यश मिळाले हा समज दृढ होत गेला. ज्या विषमतेतून व असमतोलातून ही समस्या उद्भवली तो दूर करायचा असेल तर विकास हवा याकडे कायमच दुर्लक्ष झाले. त्याचा परिणाम असा की मारले जाणाऱ्या नक्षलींचे चेहरे व नावे



तेवढी बदलत राहिली. हिंसाचार मात्र कायम राहिला. मध्यंतरी मोदी सरकारने नोटाबंदी केली तेव्हा नक्षल चळवळ आता संपणार अशा वल्गना केल्या गेल्या. प्रत्यक्षात त्यांना होणारा अर्थपुरवठा कमी होण्याऐवजी त्यात वाढच झाली हे अलीकडे त्यांच्याकडून जप्त होणाऱ्या अत्याधुनिक शस्त्रसाठ्यावर एक नजर टाकली तरी ते लक्षात येते. एक हजार मीटरपर्यंत मारा करू शकणाऱ्या एलएमजी बंदुका, रॉकेट व ग्रेनेड लॉंचर्स ही या जप्तसाठ्यात नव्याने आढळून आलेली शस्त्रे. ती त्यांना कशी मिळाली वा त्यांनी ती कुठे तयार केली याचा शोध सरकारी यंत्रणांनी घेतला नाही. नक्षलींचा प्रभाव असलेल्या भागात जितकी विकासकामे जास्त तेवढा त्यांना अर्थपुरवठा अधिक हे सर्वश्रुत असलेले सत्य. ही रसद मोडून काढायची असेल तर त्यांचा प्रभाव कमी करून भयमुक्त वातावरण निर्माण करणे गरजेचे. त्यासाठी स्थानिकांचा विश्वास जिंकणे आवश्यक. त्यासाठी प्रशासनाचे बळकटीकरण करणे महत्त्वाचे. याकडे लक्ष न देता केवळ चकमकीत नक्षली मारत राहणे हा सरकारचा प्राधान्यक्रम राहिला. त्यामुळे वर्षांनुवर्षे सुरू असलेला हा हिंसाचार कायम आहे. दोन दिवसांपूर्वीच भंडाऱ्यात झालेल्या सभेत देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी नक्षलवाद संपवला असे विधान केले. तसे असेल तर इतक्या मोठ्या संख्येने मारले जाणारे नक्षली जंगलात येतात कुठून? अशा हिंसक समस्येचे मूळ शोधून त्यावर उपाय करण्याऐवजी डावा म्हणजे विरोधी विचाराचा माणूस मारला गेला की आनंद व्यक्त करणे हे सरकारचे धोरण कसे असू शकते? बंदुकीच्या बळावर लोकशाही व्यवस्था कुणीही उलथवून टाकू शकत नाही हे या चळवळीच्या प्रभावक्षेत्रातील जनतेला पटवून द्यायचे असेल तर सरकारी धोरणातही वेगळा विचार हवा. पण हीच गोष्ट सरकार लक्षात घ्यायला तयार नाही. अशा हिंसाचारात मारले जाणारे नक्षली असो वा जवान, ते स्थानिकच असतात. यातून होणाऱ्या असंतोषाने या चळवळीला बळ मिळत जाते हा अनुभव आहे. छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार होते तेव्हा नक्षलवाद वाढला असा आरोप मोदी व शहा यांनी सातत्याने केला. आता भाजपचे सरकार असूनही त्याची वाढ खुंटलेली नाही हे ताज्या चकमकींनी दाखवून दिले. मग आरोपाचे काय? मुळात या समस्येकडे राजकीय दृष्टिकोनातून बघणेच चूक. दरवर्षी उन्हाळ्यात जंगलात नक्षली 'टॅक्टिकल काऊंटर अफेन्सिव्ह कॅम्पेन (टीसीओसी) राबवतात. तेंदूपाने गोळा करण्याच्या निमित्ताने स्थानिकांचा वाढलेला वावर त्यांच्या फायद्याचा ठरतो. अलीकडच्या काही वर्षांत या काळात होणाऱ्या हिंसाचारात सुरक्षा दलांना यश मिळणे समाधानाची बाब असली तरी परिस्थिती सदैव अनुकूल राहील याची खात्री देता येत नाही. हा धोका लक्षात घेऊन सरकारने पावले उचलणे गरजेचे. देश लोकशाहीचा उत्सव असलेल्या निवडणुकीत आनंदाने सहभागी होत असताना ती मोडून काढण्याची भाषा करणाऱ्या या चळवळीने व तिला पाठिंबा देणाऱ्यांनी या हिंसाचाराकडे डोळसपणे बघणे आवश्यक आहे.

## संपादकीय »

### आजचा मुत्सद्दी

***एखादा राजदूत करणार असेल तर त्याच्या मुत्सद्दी म्हणवून घेण्याच्या पात्रतेविषयी प्रश्न निर्माण होतात.***

जगातील अनेक महत्त्वाच्या आणि निर्भीड वृत्तपत्रांप्रमाणे आयर्लंडमधील 'द आयरिश टाइम्स' या वर्तमानपत्रासही भारतात माध्यमस्वातंत्र्य आणि लोकशाही संकोच होत असल्याचे आढळले. या वर्तमानपत्राने आपल्या संपादकीयात भारतातील सरकारी वरवंट्याचा दाखला दिला आणि 'आप'चे अरविंद केजरीवाल यांच्या तुरुंगवासाचा उल्लेख केला. भारतात काँग्रेसच्या मुस्कटदाबीचे कसे प्रयत्न झाले ही बाबदेखील हे वर्तमानपत्र नमूद करते. 'मोदींची पकड घट्ट' अशा शीर्षकाच्या या संपादकीयात भारतातील राजकीय परिस्थितीवर विविध अंगाने भाष्य आहे. आपल्याकडे निवडणुका सुरू आहेत. यानिमित्ताने 'लोकशाहीची जननी' इत्यादी असलेल्या आपल्या देशात अन्य देशीय अनेक माध्यमांस रस निर्माण होणे साहजिक. अशा काही महत्त्वाच्या माध्यमगृहांनी आपापले प्रतिनिधी या निवडणुकांच्या वार्तांकनासाठी भारतात पाठवले.

सदानंद दाते हे चुकीची कामे करण्यासाठी होणाऱ्या विनंतीला बधणारे नाहीत, हे जाणकारांना माहीत आहे. सत्तेत असलेल्यांना असे अधिकारी 'सोयी'चे नसतात, हे वास्तव आहे. भारतीय पोलीस सेवेने आपल्या ७० वर्षांमध्ये जी तेजस्वी रत्ने दिली, त्यापैकी एक आहेत.

# आमच्या उत्तराधिकाऱ्यांपुढचा काळ कठीण!

महाराष्ट्र केडरचे सदानंद दाते. राज्यघटना आणि कायद्यावरील निष्ठेपेक्षा सत्तेत असलेल्या पक्षावरील निष्ठेला प्राधान्य दिले जात असतानाच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणून काम केले आहे. माझ्या पिढीच्या अधिकाऱ्यांवर ही वेळ आली नव्हती. ते ज्या समाजातून आले आहेत, तो सत्य आणि न्याय, मूल्य प्रणाली, साधी राहणी, उच्च विचारसरणी यासाठी ओळखला जातो. सदानंद दाते यांच्या व्यक्तिमत्त्वात ते सर्व गुण सामावलेले आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून त्यांनी भारतीय पोलीस सेवेत प्रवेश केला. लहानपणापासून असलेली बेताची परिस्थिती त्यांच्या या ध्येयाच्या आड आली नाही. सर्वत्र कौतुकास्पद असलेल्या या माणसाची मुंबई महानगराच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती झाली असती तर मुंबईकरांना खरोखरच आवडले असते. पण सदानंद दाते हे चुकीची कामे करण्यासाठी होणाऱ्या विनंतीला बधणारे नाहीत,




हे जाणकारांना माहीत आहे. त्यामुळे नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी म्हणजेच एनआयएचे महासंचालक दिनकर गुप्ता यांच्या जागेवर सदानंद दाते यांची नियुक्ती व्हावी यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते. अलीकडेच मी 'द बॅकरूम मिश्चिफ मेकर्स' हा निवृत्त आयएएस अधिकारी मॅथ्यू जॉन यांचा लेख वाचला. या लेखात त्यांनी नोकरशाहीची, विशेषत: भारतीय पोलीस सेवा आणि भारतीय महसूल सेवा यांच्याशी संबंधित यंत्रणा आणि त्यातील अधिकाऱ्यांवर कठोर टीका केली आहे. या यंत्रणा राजकारण्यांनी वाकायला सांगितले तर रांगायला सुरुवात करतात, असे लेखकाचे म्हणणे आहे. या लेखात ईडीचा उल्लेख आहेच शिवाय सीबीआय आणि एनआयएचाही उल्लेख आहे. तीन-चार वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील आणखी एक उत्कृष्ट आयपीएस अधिकारी सुबोध जयस्वाल यांची सीबीआयच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली होती. त्यांनी फारसा गाजावाजा न करता काम केले. त्यांना मुदतवाढ मिळाली नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर आणखी काही पदे आणि इतर फायदे मिळाले नाहीत. ही खरे तर त्यांच्या सचोटीला मानवंदनाच आहे. जे सत्तेपुढे झुकतात, त्यांना त्याचे बक्षीस मिळते, हे एक उघड सत्य आहे. सुबोध जयस्वाल कोणापुढेच झुकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. सदानंद दाते यांच्या नेतृत्वाखालील एनआयएदेखील कितीही दबाव आला, तो कितीही असह्य झाला तरीही कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करणार नाही, याची मला खात्री आहे. सदानंद दाते हा एक असा माणूस आहे ज्याने जबाबदारी स्वीकारण्याआधीच त्याच्या अटी निश्चित केल्या असतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादीतून फुटून गेलेले पाकिटमार!

## जितेंद्र आव्हाडांची अजित पवारांवर जहरी टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसमधून अजित पवारांसह फुटून गेलेले सगळेजण पाकिटमार आणि दरोडेखोर आहेत अशी जहरी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. जितेंद्र आव्हाड यांनी बुधवारीही अजित पवारांवर टीका केली होती. अजित पवार यांनी मुलींच्या जन्मदरावर बोलताना द्रौपदीचं उदाहरण दिलं होतं. त्यावर विचारलं असता अजित पवारांच्या डोक्यातलं विष बाहेर आलं असं म्हटलं होतं. आता त्यांनी पुन्हा एकदा अजित पवारांवर टीका केली.**



पवार हे उघडपणे सांगू शकतात की मी मोक्काचा आरोपी मी सोडवला. तसंच त्यांनी महाराष्ट्रातल्या स्त्रियांबद्दल जे द्रौपदीचं वक्तव्य केलं तो किती विषारी विचार आहे. महाभारत वाचल्यावर समजत नाही का काय लिहिलं आहे द्रौपदीबद्दल? आजच्या लेकींना द्रौपदी म्हणणं हा कुठल्या स्तरावरचा विचार आहे? समस्त स्त्री वर्गाचा अपमान अजित पवार यांनी केला आहे. त्यांची मानसिकता अशीच आहे.” असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.एकनाथ शिंदे जेव्हा पळून गेले तेव्हा अजित पवारही पळून जाण्याच्या तयारीत होते. त्या पलायनात माझ्या बरोबर सहभागी व्हा अशी अजित पवारांची मानसिकता होती. शरद पवारांना एकटं पाडणार नाही. असं त्यांनी म्हटलं होतं. हे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादीचा भाजपासह जाण्याचा ठराव झाला होता का? यावर आव्हाड यांनी स्पष्टीकरण दिलं. एबीपी माझाच्या ‘तोंडी परीक्षा’ या कार्यक्रमात जितेंद्र आव्हाड यांनी हे वक्तव्य केलं आहे.राष्ट्रवादीतून फुटून गेलेले अजित पवारांसह सगळेजण पाकिटमार आणि दरोडेखोर आहेत. दरोडेखोर मंगळसूत्र घेऊन लुटून घेऊन जातात आणि बायकोच्या गळ्यात घालतात. तसाच प्रकार घडला आहे. त्यांच्याकडे आत्ता असूदेत मंगळसूत्र पण येणारा काळ सांगेल कुठलं मंगळसूत्र खरं आहे? पाकिटमार कधी ना कधी पकडला जातो. हे पाकिटमार पकडले जाणार. पाकिटमार ते होतेच आम्ही बोलत नव्हतो. अजित पवारांनी पक्षावर दरोडाच घातला. जे काही घडलं ते सांगतात ३० जूनला. बैठक झाल्याचा पुरावा द्यावा. २५ जून ला म्हणाले शरद पवार सर्वस्व आहेत. एवढंच काय ३ जुलैला प्रश्न विचारण्यात आला अजित पवारांना की तुमचे अध्यक्ष कोण? त्यावर त्यांनी शरद पवार हेच नाव घेतलं. याला दरोडा नाही म्हणणार तर काय म्हणणार?” असा प्रश्न जितेंद्र आव्हाड यांनी विचारला आहे.त्यांनी सगळ्यांना जमवलं. त्यातले काही जण अजित पवारांसह पळायला तयार झाले. आमच्यातले काही लोक होते ज्यांचे पाय लटपटत होते, त्यातला एक होता प्राजक्त तनपुरे त्याने सही करणार असं म्हटलं होतं. मात्र बाहेर येऊन मला म्हणाला की मी यांच्याबरोबर जाणार नाही. मी शरद पवारांबरोबरच आहे. ते सगळं झाल्यावर मला जयंत पाटील म्हणाले की मी वेडा माणूस नाही, हे पत्रच मी शरद पवारांना देणार नाही. शरद पवारांना एकटं पाडणार नाही.

### काय म्हणाले जितेंद्र आव्हाड?

» पवार हे उघडपणे सांगू शकतात की मी मोक्काचा आरोपी मी सोडवला. तसंच त्यांनी महाराष्ट्रातल्या स्त्रियांबद्दल जे द्रौपदीचं वक्तव्य केलं तो किती विषारी विचार आहे. महाभारत वाचल्यावर समजत नाही का काय लिहिलं आहे द्रौपदीबद्दल? आजच्या लेकींना द्रौपदी म्हणणं हा कुठल्या स्तरावरचा विचार आहे? समस्त स्त्री वर्गाचा अपमान अजित पवार यांनी केला आहे. त्यांची मानसिकता अशीच आहे.” असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.एकनाथ शिंदे जेव्हा पळून गेले तेव्हा अजित पवारही पळून जाण्याच्या तयारीत होते. त्या पलायनात माझ्या बरोबर सहभागी व्हा अशी अजित पवारांची मानसिकता होती. त्यांनी सगळ्यांना जमवलं. त्यातले काही जण अजित पवारांसह पळायला तयार झाले. आमच्यातले काही लोक होते ज्यांचे पाय लटपटत होते, त्यातला एक होता प्राजक्त तनपुरे त्याने सही करणार असं म्हटलं होतं. मात्र बाहेर येऊन मला म्हणाला की मी यांच्याबरोबर जाणार नाही. मी शरद पवारांबरोबरच आहे. ते सगळं झाल्यावर मला जयंत पाटील म्हणाले की मी वेडा माणूस नाही, हे पत्रच मी शरद पवारांना देणार नाही.

# ‘यमराज’ लोकसभा निवडणूकीच्या रिंगणात?

## अपक्ष उमेदवार राम गायकवाड यांची रेड्यावर बसून जोरदार एन्ट्री

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माढा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवार हे चक्क रेड्यावर बसून यमराजाच्या वेशात निवडणूक अधिकारी कार्यालयात आले. देशातील वाढता भ्रष्टाचार रोखण्यासाठी आपणांस संसदेत जायचे आहे.**




म्हणून लोकसभा लढविण्याचे ठरविल्याचे यमराजाच्या रूपाने उमेदवारी दाखल केलेले अपक्ष उमेदवार राम गायकवाड यांनी सांगितले. ओबीसी कोट्यातून मराठा आरक्षण मिळावे, वाढत्या भ्रष्टाचारावर आळा बसावा आणि सत्ताधारी पक्षाकडून ईडी व अन्य तपास यंत्रणांचा होणारा गैरवापर टाळावा, यासाठी आपण यमराज बनून येत असल्याचे राम गायकवाड यांनी सांगितले. माढा लोकसभेसाठी उमेदवारी भरण्याकरिता यमराजाच्या पोशाखात रेड्यावर बसून सात रस्त्यावरील जिल्हाधिकारी कार्यालयात आलेल्या राम गायकवाड यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. या यमराजासोबत सुमारे शंभर कार्यकर्त्यांचा सहभाग होता.माढा लोकसभा निवडणुकीत भाजपचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात प्रतिष्ठेची लक्षवेधी लढत होत आहे. याच मतदारसंघात यमराज बनून राम गायकवाड यांनी उमेदवारी दाखल केल्यामुळे हा चर्चेचा विषय ठरला आहे. प्रसिध्दीचा अनोखा फंडा म्हणून यमराजाने ही शक्कल लढविल्याचे मानले जाते.

### यमराज बनून उमेदवारी दाखल

» अपक्ष उमेदवार राम गायकवाड यांनी सांगितले. ओबीसी कोट्यातून मराठा आरक्षण मिळावे, वाढत्या भ्रष्टाचारावर आळा बसावा आणि सत्ताधारी पक्षाकडून ईडी व अन्य तपास यंत्रणांचा होणारा गैरवापर टाळावा, यासाठी आपण यमराज बनून येत असल्याचे राम गायकवाड यांनी सांगितले. माढा लोकसभेसाठी उमेदवारी भरण्याकरिता यमराजाच्या पोशाखात रेड्यावर बसून सात रस्त्यावरील जिल्हाधिकारी कार्यालयात आलेल्या राम गायकवाड यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. या यमराजासोबत सुमारे शंभर कार्यकर्त्यांचा सहभाग होता. माढा लोकसभा निवडणुकीत भाजपचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात प्रतिष्ठेची लक्षवेधी लढत होत आहे. याच मतदारसंघात यमराज बनून राम गायकवाड यांनी उमेदवारी दाखल केल्यामुळे हा चर्चेचा विषय ठरला आहे.

# EVM मुळे भाजपाला अतिरिक्त मते?

## उमेदवारांना 5 टक्के मशीन निवडण्याची परवानगी आहे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ईव्हीएमवरून केलेल्या मतदारांचं क्रॉस व्हेरिकेशन व्हीव्हीपीएटीच्या स्लिपवरून करण्याच्या मागणीच्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी ईव्हीएमबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाबाबत निवडणूक आय़ोगाने स्पष्टीकरण दिलं आहे. “इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या निर्मात्याला कोणते बटण कोणत्या राजकीय पक्षाला दिले जाणार आहे किंवा कोणते मशीन कोणत्या राज्यात किंवा मतदारसंघात दिले जाणार आहे हे माहित नसतं”, असं निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



मशीन्स आणि त्यांच्या VVPAT (मतदार-व्हेरिफिकेशन पेपर ऑडिट ट्रेल) युनिट्सच्या कार्याबद्दल प्रश्नांची उत्तरे देताना आयोगाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाला सांगितले की, “मतदान युनिटमध्ये बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपीएटी युनिट असते, जे मुळात प्रिंटर असते.” ईव्हीएमवरून केलेल्या मतदारांचं क्रॉस व्हेरिकेशन व्हीव्हीपीएटीच्या स्लिपवरून करण्याच्या मागणीच्या याचिकेवर आज न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मतदानाच्या सात दिवस आधी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत VVPAT मशीनच्या 4 MB फ्लॅश मेमरीवर चिन्हांच्या प्रतिमा (पक्षचिन्हाचे फोटो) अपलोड केल्या जातात. त्यात फक्त पक्षाची चिन्हे चिकटवलेली बटणे असतात. जेव्हा एखादं बटण दाबलं जातं, तेव्हा युनिट कंट्रोल युनिटला संदेश पाठवतं, जे VVPAT युनिटला अलर्ट करतं. जे यामधून दाबलेल्या बटणाशी जुळणारे चिन्ह छापते, अशं अधिकाऱ्याने सांगितलं. दरम्यान, याचिकाकर्ता असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सचे वकील प्रशांत भूषण यांनी एका मल्याळम दैनिकातील एका अहवालाचा संदर्भ दिला की बुधवारी केरळमधील मॉक पोल दरम्यान, चार ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी युनिट्सने भाजपाच्या चिन्हाला अतिरिक्त मत नोंदवले गेले. न्यायालयाने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहेत.

### VVPAT मशिनचं कार्य कसं चालतं?

» तसंच, हा अहवाल खोटा असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.गुरुवारी, खंडपीठाने आयोगाला व्हीव्हीपीएटी मशीनचं कार्य कसं चालतं, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या सहभागाचा टप्पा आणि कोणतीही छेडछाड होणार नाही याची खात्री करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत हे स्पष्ट करण्यास सांगितले.“निवडणूक ही एक प्रक्रिया असते. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेचं पावित्र्य जपावं लागतं. जे अपेक्षित आहे ते केले जात नाही, अशी भीती कुणालाही वाटू नये”, असे न्यायमूर्ती दत्ता म्हणाले. प्रक्रियेचे स्पष्टीकरण देताना, आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, व्हीव्हीपीएटी युनिटवर चिन्हे लोड केल्यानंतर, योग्य चिन्हे लोड केली गेली आहेत याची खात्री करण्यासाठी त्यास प्रिंट करण्याचा आदेश दिला जातो.मतदानाच्या तारखेपूर्वीच मशीन्स स्ट्राँग रूममध्ये ठेवल्या जातात आणि एकतर्फी उघडल्या जाऊ शकत नाहीत, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. ते पुढे म्हणाले की साधारणपणे प्रत्येक विधानसभा विभागात एक स्ट्राँग रूम असते. सर्व मशीन्स मॉक पोलद्वारे ठेवल्या जातात आणि उमेदवारांना ५ टक्के मशीन निवडण्याची परवानगी आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# अरविंद केजरीवाल तुरुंगात आंबे, बटाटे खातात!

## समस्या अधोरेखित करत घड्याळाचे काटे उलटे फिरवण्यावर आक्षेप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आप या पक्षाचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मागच्या महिन्यात अटक करण्यात आली आहे. मद्य धोरण घोटाळा प्रकरणात ईडीने मागच्या महिन्यात ही कारवाई केली. अरविंद केजरीवाल हे तिहार तुरुंगात आहेत. या दरम्यान दिल्लीतल्या राऊज एव्हेन्यू कोर्टात अरविंद केजरीवाल यांनी केलेल्या याचिकेवरच्या सुनावणीदरम्यान ईडीने त्यांच्यावर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे न्यायालयाकडून जामीन मिळवण्यासाठी केजरीवाल यांच्याकडून खटाटोप केला जातो आहे असंही ईडीने म्हटलं आहे.**



अरविंद केजरीवाल तुरुंगात मिठाई, आंबे, साखर, बटाटे खात आहेत. त्यांना मधुमेहाचा त्रास आहे. तरीही त्यांची शुगर वाढावी म्हणून अरविंद केजरीवाल प्रयत्न करत आहेत. मिळवण्याचा प्रयत्न केजरीवाल करत आहेत असा आरोप ईडीने केला आहे. ईडीच्या आरोपानंतर ईडीने अरविंद केजरीवाल यांचा डाएट चार्ट मागवला आहे.अरविंद केजरीवाल यांना टाइप २ प्रकारचा मधुमेह आहे. अरविंद केजरीवाल जाणीवपूर्वक बटाटे, मिठाई, आंबे खात आहेत. जाणीवपूर्वक गोड पदार्थांचं सेवन करत आहेत. या सेवनामुळे त्यांची शुगर लेव्हल वाढेल आणि त्यांना जामीन मिळण्यास मदत होईल असा दावा ईडीने न्यायालयात केला आहे. तुरुंग प्रशासनाने आम्हाला अरविंद केजरीवाल यांचा डाएट प्लान दिला आहे. त्यामध्ये केजरीवा काय काय खातात याची माहिती आहे. आंबे, बटाटे, मिठाई हे गरजेपेक्षा जास्त खात आहेत हे सगळं ते मुद्दाम करत आहेत असाही आरोप ईडीने केला आहे. आता या प्रकरणी पुढच्या शुक्रवारी सुनावणी होणार आहे.दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या पत्नीमार्फत आपच्या कार्यकर्त्यांसाठी खास संदेश पाठवला आहे. ”तुम्हा सर्वांना मी नमस्कार करतो. मी आज तुम्हाला मलाच वोट करा असं सांगत नाही. आगामी निवडणुकीत तुम्हाला कोणाला पराभूत करण्यासाठी किंवा विजयी करण्यासाठी आवाहनही करत नाही. मी १४० कोटी देशवासीयांना भारतासाठी सहयोग देण्याची आवाहन करत आहे. नवा भारत बनवण्यासाठी मी तुम्हाला आमंत्रित करत आहे. भारत महान देश आहे. आपली संस्कृती फार काळ पूर्वीची आहे. तरीही आपल्या देशात लोक अशिक्षित का आहेत? गरिब का आहेत? असा सवाल केजरीवाल यांनी तुरुंगातून पाठवलेल्या संदेशातून केला आहे.अरविंद केजरीवाल तुरुंगात मिठाई, आंबे, साखर, बटाटे खात आहेत. तरीही त्यांची शुगर वाढावी म्हणून अरविंद केजरीवाल प्रयत्न करत आहेत. त्याद्वारे जामीन मिळवण्याचा प्रयत्न केजरीवाल करत आहेत असा आरोप ईडीने केला आहे. ईडीच्या आरोपानंतर ईडीने अरविंद केजरीवाल यांचा डाएट चार्ट मागवला आहे.अरविंद केजरीवाल यांना टाइप २ प्रकारचा मधुमेह आहे. अरविंद केजरीवाल जाणीवपूर्वक बटाटे, मिठाई, आंबे खात आहेत.

### कार्यकर्त्यांसाठी खास संदेश

» जाणीवपूर्वक गोड पदार्थांचं सेवन करत आहेत. या सेवनामुळे त्यांची शुगर लेव्हल वाढेल आणि त्यांना जामीन मिळण्यास मदत होईल असा दावा ईडीने न्यायालयात केला आहे. तुरुंग प्रशासनाने आम्हाला अरविंद केजरीवाल यांचा डाएट प्लान दिला आहे. त्यामध्ये केजरीवा काय काय खातात याची माहिती आहे. आंबे, बटाटे, मिठाई हे गरजेपेक्षा जास्त खात आहेत हे सगळं ते मुद्दाम करत आहेत असाही आरोप ईडीने केला आहे. आता या प्रकरणी पुढच्या शुक्रवारी सुनावणी होणार आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या पत्नीमार्फत आपच्या कार्यकर्त्यांसाठी खास संदेश पाठवला आहे.

# रणवीरपेक्षा जबरदस्त डान्स करतो 'जवान'चा दिग्दर्शक अॅटली

बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह त्याच्या अभिनयाबरोबर एनर्जेटिक डान्समुळे नेहमी चर्चेत असतो. त्याच्या एनर्जीचं कायम कौतुक केलं जात. पण सध्या सोशल मीडियावर असा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे; ज्यामध्ये रणवीरपेक्षा 'जवान' चित्रपटाचा दिग्दर्शक अॅटली एनर्जेटिक डान्स करताना दिसत आहे. रणवीर सिंह व अॅटलीचा हा व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'मानव मंगलानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर



करण्यात आला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक शंकर यांची मुलगी ऐश्वर्या हिच्या रिसेप्शन सोहळ्यातला हा व्हिडीओ आहे. ज्यामध्ये अॅटलीचा जबरदस्त डान्स पाहायला मिळत आहे.व्हिडीओत, सुरुवातीला रणवीर अॅटलीला डान्स करण्यासाठी तयार करताना दिसत आहे. त्यानंतर अॅटली जो काही भन्नाट डान्स करू लागतो रणवीर त्याच्याकडे पाहतच राहतो. मग दोघं एकत्र मिळून जबरदस्त डान्स करायला लागतात. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.रणवीर व अॅटलीच्या या व्हिडीओला ३ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. तर १० हजारांहून अधिक लाइक्स मिळाले आहेत. तसेच नेटकऱ्यांनी देखील भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत.बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह त्याच्या अभिनयाबरोबर एनर्जेटिक डान्समुळे नेहमी चर्चेत असतो. त्याच्या एनर्जीचं कायम कौतुक केलं जात. पण सध्या सोशल मीडियावर असा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे; ज्यामध्ये रणवीरपेक्षा 'जवान' चित्रपटाचा दिग्दर्शक अॅटली एनर्जेटिक डान्स करताना दिसत आहे.

## पापाराझींवर भडकली श्रियाची वृद्ध चाहती

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी अभिनेत्री श्रिया सरन सध्या चर्चेत आहे. श्रियाच्या एका व्हिडीओने सोशल मीडियावर धुमाकूळ घातलाय. नुकत्याच 'शोटाईम' या वेब सीरिजमध्ये इमरान हाश्मीबरोबर झळकलेल्या या अभिनेत्रीने 'दो और दो प्यार' चित्रपटाच्या प्रीमियरला हजेरी लावली होती. त्यादरम्यान श्रियाच्या एका वयोवृद्ध चाहतीने पापाराझींना चांगलेच सुनावले. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. १७ एप्रिलला श्रिया सरन 'दो और दो प्यार' चित्रपटाच्या प्रीमियरला पोहोचली होती. पापाराझींसाठी पोज देताना श्रियाची वृद्ध चाहती तिथे आली. श्रियाने त्यांना सांगितलं की, या पापाराझींना जरा समजवा. तेवढ्यात श्रियाची वृद्ध चाहती पापाराझींना ओरडली आणि म्हणाली, "बस करा आता, किती गरम होतंय बिचाऱ्या मुलीला. एकतर तिने असे कपडे घातलेत आणि एवढी गरमी होतेय. ती एसीमध्ये राहणारी मुलगी आहे. तिला अशा कपड्यांमुळे आणखी गरम होत असणार", असं बोलून वृद्ध चाहतीने श्रियाला तिथून जायला सांगितलं.श्रिया आणि तिच्या चाहतीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. "ही आंटी आहे तरी कोण?" कमेंट सेक्शनमध्ये असा प्रश्न अनेकांनी विचारला.

## मसाबा गुप्ता होणार आई



प्रसिद्ध फॅशन डिझायनर मसाबा गुप्ता आणि अभिनेता सत्यदीप मिश्रा यांनी २७ जानेवारी २०२३मध्ये लग्नगाठ बांधली. भव्य लग्नसोहळा न ठेवता या कपलने कुटुंबातील काही सदस्य आणि जवळच्या मित्र-मैत्रिणींना आमंत्रित करून कोर्ट मॅरेज केलं होतं. लग्नाच्या एका वर्षानंतर आता या कपलने चाहत्यांना गुड न्यूज दिली आहे. आज (१८ एप्रिल २०२४) मसाबा आणि सत्यदीप मिश्राने त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेअर करत दोघं लवकरच आई-बाबा होणार असल्याची बातमी जाहीर केली. या पोस्टमध्ये पहिल्या फोटोत गरोदर असलेल्या महिलेचा इमोजी वापरला आहे. तर दुसऱ्या फोटोत मसाबा आणि सत्यदीपसारखे दिसणारे इमोजी वापरले आहेत. तिसऱ्या फोटोत होणाऱ्या बाळाच्या आई-बाबांचा ब्लॅक अॅड व्हाईट फोटो शेअर केला आहे.या खास पोस्टला कॅप्शन देत मसाबाने लिहिलं, "आमच्या आयुष्यात येण्यासाठी दोन इवल्याशा पायांची वाटचाल सुरू झाली आहे. कृपया प्रेम, आशीर्वाद आणि केळ्याचे वेफर्स पाठवा" "हॅशटॅग- लवकरच एक लहान बाळ येणार आहे. आईबाबा" असं हॅशटॅग मसाबाने वापरलं आहेदरम्यान, मसाबा गुप्ता आणि सत्यदीप मिश्रा यांच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर, मसाबा गुप्ताचं पहिलं लग्न निर्माते मधु मंतेना यांच्याशी झालं होतं. २०१५ मध्ये त्यांचं लग्न झालं आणि २०१९ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. तर सत्यदीप मिश्राचंही हे दुसरं लग्न आहे. सत्यदीप मिश्राचं आणि अभिनेत्री अदिती राव हैदरी यांचं लग्न झाल्याची बातमी समोर आली होती. तथापि, त्या दोघांनी कधीही वैवाहिक स्थितीबद्दल भाष्य केलं नाही. २०१३ मध्ये अदितीने खुलासा केला होता की ते दोघं वेगळे झाले आहेत.प्रसिद्ध फॅशन डिझायनर मसाबा गुप्ता आणि अभिनेता सत्यदीप मिश्रा यांनी २७ जानेवारी २०२३मध्ये लग्नगाठ बांधली. भव्य लग्नसोहळा न ठेवता या कपलने कुटुंबातील काही सदस्य आणि जवळच्या मित्र-मैत्रिणींना आमंत्रित करून कोर्ट मॅरेज केलं होतं. लग्नाच्या एका वर्षानंतर आता या कपलने चाहत्यांना गुड न्यूज दिली आहे. आज (१८ एप्रिल २०२४) मसाबा आणि सत्यदीप मिश्राने त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेअर करत दोघं लवकरच आई-बाबा होणार असल्याची बातमी जाहीर केली.

## सुशांतच्या जाण्याचं दु:ख कुणालाच नाही

दिग्दर्शक दिबाकर बॅनर्जींनी दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतबरोबर 'डिटेक्टिव्ह व्योमकेश बक्षी' या चित्रपटात काम केलं होतं. हा चित्रपट फारसा यशस्वी झाला नाही, पण यात सुशांतने केलेल्या कामाचं खूप कौतुक झालं होतं. 'लव्ह सेक्स और धोका २' या चित्रपटाच्या निमित्तानं दिलेल्या मुलाखतीत आता दिबाकर यांनी सुशांतचे निधन आणि त्यानंतर निर्माण झालेल्या वातावरणावर आपलं मत मांडलं आहे. जून २०२० मध्ये सुशांतचा मृतदेह त्याच्या घरातून सापडला होता. त्यावेळी त्याने आत्महत्या केल्याचं म्हटलं गेलं, नंतर मात्र सुशांतबरोबर काहीतरी घडलं असावा असा संशय असल्याने या प्रकरणाचा तपास आधी मुंबई पोलिसांकडे आणि नंतर सीबीआयकडे सोपवण्यात आला. या संपूर्ण प्रकरणात सुशांतला कोणीही मिस करताना दिसलं नाही, असं दिबाकर यांनी म्हटलं आहे.दिबाकर यांनी सुशांतच्या निधनानंतरचे दिवस आठवले. एका तरुण अभिनेत्याच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्याऐवजी लोकांचे लक्ष त्याच्या मृत्यूपर्यंत कारणीभूत असलेल्या गोष्टींवर होते. "त्याच्या निधनानंतर त्याच्या मृत्यूबद्दल बऱ्याच गोष्टी सुरू होत्या, पण मी तेव्हा येणाऱ्या बातम्यांमुळे मी या सर्व गोष्टींपासून दूर गेलो. मी सगळं ऐकत होतो, पण एका तरुण अभिनेत्याचं निधन झालंय, असं म्हणताना मला कुणीच दिसलं नाही. मी माझ्या आजुबाजूला कुणालाच त्याच्या निधनावर शोक व्यक्त करताना पाहिलं नाही. लोक त्याच्या निधनात मसालेदार गॉसिप शोधत होते, ते सगळं पाहिल्यावर मला त्या परिस्थितीपासून दूर जावं लागलं, कारण कुणीही सुशांतला गमावल्याबद्दल दुख व्यक्त करत नव्हतं," असं दिबाकर म्हणाले.दिबाकर म्हणाले की सुशांतच्या यशाबद्दल कोणीही बोलत नव्हतं, सगळे फक्त 'षड्यंत्र, ड्रग्ज, खून' याबाबत बोलत होते. "त्याच्या निधनानंतर शोकसभा कुठे झाल्या? त्याच्या चित्रपटांबद्दल कुठे बोललं गेलं? जे लोक त्याच्यावर प्रेम करत होते, त्यांनी त्याच्या चित्रपटांच स्क्रिनींग ठेवायला पाहिजे होतं. आपण त्याच्या चांगल्या आठवणी का जपत नाही?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. लोकांनी फक्त आपलं दुःख विसरायला त्याच्या निधनाची चर्चा केली, त्यात शोक दिसलाच नाही, असं स्पष्ट मत त्यांनी मांडलं.

## सलमानच्या घरी पोहोचली शिल्पा



अभिनेत्री शिल्पा शेट्टी व तिचा पती राज कुंद्रा यांची ९७.७९ कोटी रुपयांची संपत्ती ईडीने जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. पॉन्झी घोटाळ्याप्रकरणी ईडीने ही कारवाई केली आहे. अभिनेत्रीची संपत्ती जप्त झाल्यानंतर ती तिच्या घरातून सलमान खानच्या घरी जाताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली आहे.शिल्पा शेट्टी तिची आई सुनंदा यांच्याबरोबर वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील सलमान खानच्या घरी गेली. सलमान खानच्या घरावर तीन दिवसांपूर्वी पहाटे गोळीबार झाला होता. तेव्हापासून अनेक सेलिब्रिटींनी अभिनेत्याच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली आहे. आता शिल्पाही आईबरोबर सलमानच्या घरी गेली. तिच्या संपत्तीवर ईडीने जप्तीची कारवाई केल्याची बातमी आल्यानंतर ती पहिल्यांदाच घराबाहेर पडली आणि सलमानच्या घरी गेली आहे.अभिनेता सलमान खानच्या घरावर रविवारी पहाटे गोळीबार झाला. या हल्ल्याची जबाबदारी गँगच्या अनमोल बिश्नोईने घेतली होती.

# मुंबईनं पंजाबच्या तोंडचा घास पळवला

## मुंबईनं अखेरच्या षटकात मिळवला निसटता विजय

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**मुंबई विरूद्ध पंजाबच्या अटीतटीच्या सामन्यात मुंबई इंडियनसच्या संघाने शेवटी बाजी मारली. मुंबई इंडियनसने पंजाबला ऑल आऊट करत पंजाबवर ९ धावांनी निसटता विजय मिळवला. आशुतोष शर्माने अखेरच्या षटकांमध्ये मुंबईवर दबाव आणला खरा पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. आशुतोष शर्माची विकेट मुंबईसाठी महत्त्वाची ठरली.**



### सिंग आणि शर्माच्या जोडीची कमाल

१९व्या षटकात मैदानात सेट झालेल्या हरप्रीत ब्रारनेही आपली विकेट गमावली.पण मधवालच्या अखेरच्या षटकात मोहम्मद नबीने चांगली फिल्डींग करत चेंडू इशान किशनकडे पाठवला आणि रबाडा धावबाद झाल्याने पंजाब ऑल आऊट झाला आणि मुंबईने अखेरीस सामना जिंकला. मुंबईने पंजाबला दिलेल्या १९२ धावांचा पाठलाग करताना पहिल्या २ चेंडूवर १० धावा करत पंजाबची चांगली सुरूवात झाली. पण पहिल्याच षटकात प्रभसिमरन सिंग गोल्डन डकवर बाद झाला. त्यानंतर बुमराहने आपल्या पहिल्याच षटकात दोन मोठे विकेट मिळवले. चौथ्या चेंडूवर बुमराहने रूसोला क्लीन बोल्ड करत एका धावेवर माघारी धाडले तर सॅम करनला इशानकडून झेलबाद करत सामन्याला वेगळे वळण दिले.

१९व्या षटकात मैदानात सेट झालेल्या हरप्रीत ब्रारनेही आपली विकेट गमावली. हरप्रीत बाद झाल्यानंतर आलेल्या रबाडाने पहिल्याच चेंडूवर षटकार खेचला आणि पुन्हा एकदा वातावरण बदलले. पण मधवालच्या अखेरच्या षटकात मोहम्मद नबीने चांगली फिल्डींग करत चेंडू इशान किशनकडे पाठवला आणि रबाडा धावबाद झाल्याने पंजाब ऑल आऊट झाला आणि मुंबईने अखेरीस सामना जिंकला. मुंबईने पंजाबला दिलेल्या १९२ धावांचा पाठलाग करताना पहिल्या २ चेंडूवर १० धावा करत पंजाबची चांगली सुरूवात झाली. पण पहिल्याच षटकात प्रभसिमरन सिंग गोल्डन डकवर बाद झाला. त्यानंतर बुमराहने आपल्या पहिल्याच षटकात दोन मोठे विकेट मिळवले. चौथ्या चेंडूवर बुमराहने रूसोला क्लीन बोल्ड करत एका धावेवर माघारी धाडले तर सॅम करनला इशानकडून झेलबाद करत सामन्याला वेगळे वळण दिले. तर पुढच्याच षटकात कोएट्झीने लिव्हिंगस्टोनला झेलबाद करवत ४ टॉप फलंदाजांना पॉवरप्लेमध्ये बाद केले. त्यानंतर हरप्रीत भाटीया आणि शशांक सिंगने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण त्याला श्रेयस गोपालने झेलबाद केले. तर उपकर्णधार जितेश शर्माला ९ धावांमध्ये यष्टीचीत केले. पण त्यानंतर पुन्हा एकदा शशांक सिंग आणि आशुतोष शर्माच्या जोडीने कमाल केली. शशांक आणि आशुतोषने शानदार खेळी करत मुंबई इंडियनसवर दबाव आणला. पण बुमराहने ही जोडी तोडत शशांक सिंगला झेलबाद केले. बाद होण्यापूर्वी शशांकने २५ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ४१ धावा केल्या. मैदानात कायम असलेल्या आशुतोषने शानदार अर्धशतक झळकावले. पण तो संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला. १८व्या षटकात बाद होण्यापूर्वी आशुतोषने २८ चेंडूत ७ षटकार आणि २ चौकारांची ६१ धावा केल्या. बुमराहच्या गोलंदाजीवर आशुतोषने एक दमदार षटकार लगावला, ज्याची खूप प्रशंसा केली जात आहे. तत्पूर्वी नाणेफेक गमावल्यानंतर मुंबई इंडियनसने प्रथम फलंदाजी करत ७ बाद १९२ धावा केल्या. सलामीला आलेला इशान किशन स्वस्तात बाद झाला पण रोहितने २५ चेंडूत ३६ धावांची शानदार खेळी केली. तर सूर्यकुमार यादवने पुन्हा एकदा आपला दमदार फॉर्म दाखवून दिला, सूर्याने ५३ चेंडूत ३ षटकार आणि ७ चौकारांच्या मदतीने ७८ धावा केल्या. रोहित आणि सूर्याने ८१ धावांची चांगली भागीदारी रचली. त्यानंतर तिलक वर्मानेही १८ चेंडूत ३४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर टीम डेव्हिड १४ धावा करत बाद झाला. अखेरच्या षटकांमध्ये पंजाबने सामन्यात पुनरागमन करत मुंबईच्या धावांना ब्रेक लावला आणि मुंबईला २०० धावांचा टप्पा गाठू दिला नाही. पंजाबकडून हर्षल पटेलने ३ विकेट्स घेतले.

# सर्व सीझन खेळलेल्या रोहितने रचला इतिहास

## पंजाबविरुद्धचा सामना सुरू होताच हिटमॅनच्या नावे मोठी कामगिरी

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ च्या ३३व्या सामन्यात पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्सचे संघ आमनेसामने आहेत. मुल्लानपूर येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर हा सामना खेळवला जात आहे. हा सामना सुरु होताच मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माने आयपीएलमध्ये इतिहास रचला आहे. एमएस धोनीनंतर ही कामगिरी करणारा रोहित शर्मा दुसरा खेळाडू बनवला आहे.**



### रोहित शर्माने 6472 धावा केल्या

सलामीसाठी आलेल्या रोहित शर्माने २५ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ३६ धावा केल्या. रोहित शर्माने आयपीएलमध्ये आतापर्यंत ३०.१० च्या सरासरीने ६४७२ धावा केल्या आहेत. यारदरम्यान त्याने १३१.२२ च्या स्ट्राइक रेटने ४२ अर्धशतके आणि २ शतके झळकावली आहेत. त्याचवेळी, रोहित शर्माने आयपीएलच्या या हंगामातील ६ सामन्यात ५२.२० च्या सरासरीने २६१ धावा केल्या आहेत.

पंजाब किंग्ज विरुद्ध खेळला जाणारा सामना हा रोहित शर्माच्या आयपीएल कारकिर्दीतील २५०वा सामना आहे. रोहित शर्माशिवाय एमएस धोनी हा आयपीएलमधील एकमेव खेळाडू आहे ज्याने आयपीएलमध्ये २५० सामने खेळले आहेत. धोनीने आयपीएलमध्ये आतापर्यंत २५६ सामने खेळले आहेत. रोहित शर्मा हा आयपीएलधील सर्वात यशस्वी खेळाडू आहे. त्याने ६ वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. २००८ पासूनच रोहित शर्मा आयपीएलमध्ये खेळत आहे, आयपीएलचे सर्व सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत रोहितचाही समावेश आहे.पंजाबविरूद्धच्या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर मुंबईचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. सलामीसाठी आलेल्या रोहित शर्माने २५ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ३६ धावा केल्या. रोहित शर्माने आयपीएलमध्ये आतापर्यंत ३०.१० च्या सरासरीने ६४७२ धावा केल्या आहेत. यारदरम्यान त्याने १३१.२२ च्या स्ट्राइक रेटने ४२ अर्धशतके आणि २ शतके झळकावली आहेत. त्याचवेळी, रोहित शर्माने आयपीएलच्या या हंगामातील ६ सामन्यात ५२.२० च्या सरासरीने २६१ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये एका शतकाचा समावेश आहे.पंजाब किंग्ज विरुद्ध खेळला जाणारा सामना हा रोहित शर्माच्या आयपीएल कारकिर्दीतील २५०वा सामना आहे.

रोहित शर्माशिवाय एमएस धोनी हा आयपीएलमधील एकमेव खेळाडू आहे ज्याने आयपीएलमध्ये २५० सामने खेळले आहेत. धोनीने आयपीएलमध्ये आतापर्यंत २५६ सामने खेळले आहेत. रोहित शर्मा हा आयपीएलधील सर्वात यशस्वी खेळाडू आहे. त्याने ६ वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. २००८ पासूनच रोहित शर्मा आयपीएलमध्ये खेळत आहे, आयपीएलचे सर्व सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत रोहितचाही समावेश आहे.पंजाबविरूद्धच्या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर मुंबईचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला.